Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,
AURANGABAD -431 004 Maharashtra, India
NAAC Re-accredited 'A' Grade

P.G.Admission Unit

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद- ४३१ ००४ महाराष्ट्र, भारत
नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त

पदव्युत्तर प्रवेश विभाग

P.G. Office :- (0240) 2403123 WEBSITE : www.bamu.ac.in : http://bamua.digitaluniversity.ac E-mail : pgsection@bamu.ac.in

संदर्भः- प.प्र.वि./२०१९-२०२०/ **दिनांकः ०५-०९-२०१९**

परिपत्रक

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० करीता राज्यशासनाच्या विविध शिष्यवृत्ती / फ्रीशीप योजना, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना, व साठी ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज करणेबाबत सूचना

या परिपत्रकाद्वारे शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये प्रवेश घेतलेल्या शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, मान्यताप्राप्त व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये शिकणाऱ्या आर्थिक दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना आणि डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना" तसेच मागासवर्ग प्रवर्गासाठी शासनाच्या विविध शिष्यवृत्ती / फ्रीशीप योजना ही महाराष्ट्र शासनाच्या **www.mahadbtmahait.gov.in** या संकेतस्थळावर कार्यान्वित करण्यात आली आहे.

शिष्यवृत्ती योजनासाठी अर्ज करण्याकरीता सर्व आवश्यक सूचना विविध शिष्यवृत्तीची यादी, शिष्यवृत्तीसाठीच्या पात्रतेचे नियम व अटी वरील संकेतस्थळावरील शासनाच्या संबंधित लिंकवर उपलब्ध आहेत.

उक्त सर्व शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरण्याची अंतिम मुदत दिनांक १०-१०-२०१९ निश्चित केलेली आहे. तथापि विद्यार्थ्यांनी अंतिम मुदतची वाट न पाहता लवकरात लवकर शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन भरावे. व ऑनलाईन भरलेले अर्ज पदव्युत्तर प्रवेश (शिष्यवृत्ती) विभागामध्ये दि. १५-१०-२०१९ पर्यंत विनाविलंब वेळेत सादर करावे. दि. १५-१०-२०१९ नंतर कोणत्याही विद्यार्थ्यांचे अर्ज स्विकारले जाणार नाही यांची सर्व शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसेच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचणी आल्यास त्याबाबत विद्यापीठाच्या पदव्युत्तर प्रवेश (शिष्यवृत्ती) विभागातील संबंधित कर्मचारी यांच्याशी संपर्क साधावा.

(तंत्रशिक्षण विभागांतर्गत येणारे अभ्यासक्रम व एम.एस.डब्ल्यू अभ्यासक्रमांचे विद्यार्थी वगळता)

(टिपः- सोबत महत्वाच्या सूचना व आवश्यक कागदपत्रे यांची यादी जोडली आहे.)

विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद.][
पी.जी./प्रवेश/२०१९-२०२०/1436 -1487][उपकुलसचिव
परिपत्रक क्र. १९][पदव्युत्तर प्रवेश विभाग
दिनांक ०५-०९-२०१९][

(P.T.O)

// ०२ //

या परिपत्रकाची एक प्रत:-

१) सर्व विभाग प्रमुख, (तंत्रशिक्षण व एम.एस.डब्ल्यू विभागांतर्गत येणारे अभ्यासक्रम वगळता) सर्व शैक्षणिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना सदरील परिपत्रक माहितीस्तव देऊन कळविण्यात येते की, आपल्या विभागातील प्रवेशित शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास सदरील परिपत्रक आणून दयावे.

२) संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना एक प्रत देण्यात येऊ विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उक्त परिपत्रक प्रकाशीत करण्यात यावे.

३) जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना देऊन विनंती करण्यात येते की, आपल्या स्तरावर विद्यापीठ परिसरातील विभागामध्ये प्रवेशित सर्व शिष्यवृत्ती योजना धारक विद्यार्थ्यांना सदरील परिपत्रकानुसार निश्चित केलेल्या तारखेनुसार अर्ज भरण्याबाबतची माहिती विविध वृत्तपत्रातून प्रसिद्ध करुन विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

6/9/19

उपकुलसचिव
पदव्युत्तर प्रवेश विभाग

- भारत सरकार शिष्यवृत्ती / फ्रीशीप, (SC, ST, DNT, SBC, OBC) तसेच सर्व शैक्षणिक सवलती उदा- पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शुल्क प्रतिपुर्ती योजना, प्राथमिक शिक्षक पाल्य शुल्क माफ योजना (पीएसटी), माध्यमिक शिक्षक पाल्य शुल्क माफ योजना (एसएसटी), स्वातंत्र सैनिक पाल्य योजना, एकलव्य योजना, विद्यावेतन आवेदन अर्ज साठी शासनाच्या www.mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरावा.

- महत्वाची सूचना -

१) विद्यार्थ्यांने आपला आधार क्रमांक आपल्याच बँक खात्याशी लिंक आहे काय याबाबत पडताळणी करुन घ्यावी.

२) ज्या विद्यार्थ्यांचे आधारकार्ड हे मोबाईल क्रमांकाशी संलग्नीत नाहीत. त्या विद्यार्थ्यांनी त्वरीत जवळाच्या आधारकेंद्रावर जाऊन आपले आधार क्रमांक हे मोबाईल क्रमांकाशी संलग्नीत करुन घेणे आवश्यक आहे.

३) उक्त शिष्यवृत्ती ही केवळ ज्या विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक बँकेला संलग्नीत आहे त्यांच बँक खात्यामध्ये जमा होते. आधार कार्ड हे बँकखात्याशी संलग्नीत नसल्यास शिष्यवृत्ती जमा होणार नाही व याची सर्व जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.

या शिष्यवृत्तींसाठी / शैक्षणिक सवलतींसाठी खालील आवश्यक कागदपत्रे साक्षांकित करुन ऑनलाईन अर्जाच्या प्रिंटसह जोडावयाची कागदपत्रे-

१) **उत्पन्नाचे मूळ प्रमाणपत्र.**

२) **विद्यार्थ्यांनी Original Document Scan करुन Upload करणे बंधनकारक आहे.** अन्यथा शासनाकडून शिष्यवृत्ती नामंजूर झाल्यास सर्व जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.

३) १० वी पास व त्यांनतर ज्या विविध अभ्यासक्रमास प्रवेश घेतला होता त्यासर्व अभ्यासक्रमाची माहिती ऑनलाईन अर्जामध्ये भरणे तसेच Upload करणे बंधनकारक राहील. कोणत्याही अभ्यासक्रमाची माहिती हेतुपुरस्कर लपविण्याचा प्रयत्न केल्यास शासन नियमानुसार कार्यवाहीस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील.

४) शिक्षणात खंड असल्यास खंड प्रमाणपत्र (Gap Certificate) गॅप असतांनाही तो न दाखविल्यास शिष्यवृत्ती शासनस्तरावर नामंजूर झाल्यास सर्व जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.

५) आधारकार्ड साक्षांकित प्रत. **(अर्ज भरतांना आधारकार्ड हे विद्यार्थ्यांच्या बँकखात्याशी संलग्नीत असणे अनिवार्य)**

६) बँकेच्या पासबुकच्या पहिल्या पानाची साक्षांकित प्रत.

७) आवश्यक त्या गुणपत्रिका (१० वी ते शेवटच्या शिक्षणापर्यंतच्या गुणपत्रिका) साक्षांकित प्रत.

८) स्थलांतर प्रमाणपत्र (टीसी) साक्षांकित प्रत. (Transfer Certificate)

९) रहिवासी प्रमाणपत्र (Domicile Certificate)

१०) रेशनकार्ड साक्षांकित प्रत

११) पाल्याचे शपथपत्र / प्रतिज्ञापत्र (झेरॉक्स सेंटरवर उपलब्ध)

१२) मागील वर्षी शिष्यवृत्ती घेतली असल्यास मंजूर प्रमाणपत्र जोडणे व शिष्यवृत्ती मंजूर नसल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे.

१३) विद्यार्थ्यांसाठी हजेरी पत्रक प्रमाणपत्र (Attendence Certificate)

१४) जातीचे प्रमाणपत्र साक्षांकित प्रत.

१५) **व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी व फ्रीशीप या योजनेसाठी जात वैधता प्रमाणपत्र साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.**

१६) नॉन क्रिमीलेअर (OBC)

१७) वसतिगृहात राहत असल्यास **वसतिगृहाचे मूळ प्रमाणपत्र** व वसतिगृह प्रवेश पावती साक्षांकित प्रत.

१८) वसतिगृहात राहत नसलेल्या विद्यार्थ्यांनी ज्या ठिकाणी राहत आहे त्या घरमालकाची टॅक्स पावती व बॉडवर करारनामा ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे.

१९) पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजनेसाठी आवेदन अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी अल्पभूधारक प्रमाणपत्र किंवा रोजगार हमी योजना नाव नोंदणी प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक आहे.

२०) पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना गाईडचे मूळ प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.

२१) Management Quota तून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शासनाची शिष्यवृत्ती / सवलती लागू नाही.

२२) प्रवेश पावतीची (Admission Receipt) छायांकित प्रत.

२३) विद्यार्थीनी विवाहित असल्यास व ऑनलाईन अर्ज भरतांना वडीलांकडील किंवा पतीकडील नाव असले तरीही पतीचेच मिळकत प्रमाणपत्र (Income Certificate) अर्जासोबत जोडणे आवश्यक.

टिप-

१) आवेदन अर्ज दिनांक **२३-१०-२०१९** पर्यंत भरणे आवश्यक आहे. आवेदन अर्ज न भरल्यास विद्यार्थ्यांस सर्व शैक्षणिक शुल्क भरावे लागेल याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

२) सर्व आवश्यक कागदपत्रे www.mahadbtmahait.gov.in या **संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे** व भरलेल्या आवेदन अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची साक्षांकित प्रत पदव्युत्तर विभागामध्ये जमा करणे आवश्यक.

खालील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती सवलत मिळणार नाही व अशा विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचे पूर्ण शुल्क भरावे लागेल.-

(१) शिष्यवृत्तीस पात्र नसल्यास किंवा
(२) पात्र विद्यार्थ्याने शिष्यवृत्तीचा अर्ज न भरल्यास किंवा
(३) एखाद्या अभ्यासक्रमास शासनाकडूनच शिष्यवृत्तीच मिळत नसल्यास किंवा
(२) शिष्यवृत्तीस अपात्र असतांनाही शिष्यवृत्ती अर्ज भरत असतील किंवा
(३) शिष्यवृत्तीस पात्र असतांनाही परंतु शिष्यवृत्ती अर्ज विहित वेळेत भरुन रितसर पदव्युत्तर प्रवेश विभागत जमा करणार नसतील किंवा
(४) विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती शासनस्तरावर नामंजूर होत असेल किंवा
(५) शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्याच्याच खात्यावर शासनाकडून पूर्ण शुल्क देण्यात येत असेल व विद्यापीठास शुल्क प्राप्त होत नसेल. (उदा- अल्पसंख्याक शिष्यवृत्ती, अपंग शिष्यवृत्ती) किंवा
(६) व्यावसायिक अभ्यासक्रम झालेल्या विद्यार्थ्यांने अव्यावसायिक अभ्यासक्रमास शिष्यवृत्ती अनुज्ञेय (लागू) नाही.
(७) शिष्यवृत्ती अर्ज भरल्यानंतर परीक्षा आवेदन अर्ज केवळ भरुन परीक्षा न देणे किंवा परीक्षा आवदेन अर्ज न भरणे व परीक्षा न देणे अशा विद्यार्थ्यांना सोबत दिलेल्या **परिशिष्ट अ प्रमाणे वर्षाचे पूर्ण शुल्क भरावे लागेल.**

डॉ पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना

Renewal Policy

1. मागील वर्षी सदर शिष्यवृत्ती चा लाभ घेतलेले विद्यार्थी शिष्यवृत्ती च्या नूतनीकरणासाठी अर्ज करू शकतात.

Related Documents

Documents Required

1. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
2. पालकांचे अल्पभूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूर असलेबाबतचे प्रमाणपत्र किंवा
3. शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाचे संबंधित तहसिलदार अथवा सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमापणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
4. CAP संबंधित कागदपत्रे. (केवळ विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण शास्त्र अभ्यासक्रम)
5. गॅप संबंधित दस्तऐवज (गॅप असल्यास)
6. दोन मुलांचे कुटुंब घोषणापत्र.

1. विद्यार्थ्याने शासकीय / निमशासकीय खाजगी वसतिगृहामध्ये प्रवेश घेतला / असल्यास त्या विद्यार्थ्याने त्याबाबतचा पुरावा अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
2. तसेच खाजगी मालकीच्या घरामध्ये विद्यार्थ्याने स्वतची सोयची राहण्या: केली असल्यास अशा विद्यार्थ्यास नोंदणीकृत अथवा नोटराईज्ड भाडे कराराची प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
3. एखाद्या विद्यार्थ्याने सामान्य रहिवासी असलेल्या त्याच्या गावातील शहरातील संस्थेमध्ये अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतल्यास त्यास निर्वाह भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
4. सदर योजनेचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपर्यत मर्यादित आहे.
5. एखाद्या विद्यार्थ्यास अन्य कोणत्याही योजनेखाली निर्वाह भत्ता मिळत असल्यास असा विद्यार्थी या योजनेखाली लाभ मिळण्यास अपात्र आहे.

एकलव्य आर्थिक सहाय्य

Eligibility

(शासन निर्णय दि. 07.02.1996 व 5.02.2004)

1.कला , वाणिज्य , विधी व शिक्षणशास्त्र शाखेमध्ये पदवी अभ्यासक्रमामध्ये किमान 60 टक्के व विज्ञान शाखेमध्ये पदवी अभ्यासक्रमामध्ये किमान 70 टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

2.विद्यार्थांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. 75,000/- किंवा त्यापेक्षा कमी असावे.

3.विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.

4.संबंधित लाभार्थी विद्यार्थी कुठेही पुर्णवेळ नोकरी करणारा नसावा.

5.शिष्यवृत्ती घेणारा विद्यार्थी शुल्क माफीच्या सवलतीस पात्र राहील.

6.अर्धवेळ अभ्यासक्रमाचा विद्यार्थी या शिष्यवृत्तीसाठी पात्र राहणार नाही.

7.बी .एड. प्रशिक्षण अभ्यासक्रम तसेच एम.फील व पी.एच.डी व तत्सम अभ्यासक्रमासाठी ही योजना लागू नाही.

8.सदर शिष्यवृत्ती मंजुर झाल्यास इतर केंद्र / राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेता येणार नाही.

9.महाराष्ट्र राज्याच्या बाहेर शिकत असलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकत नाहीत

Renewal Policy

1. नियमित उपस्थिती 75 टक्के असणे आवश्यक आहे.
2. पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या पहिल्या वर्षी किमान 50 टक्के गुण असणे आवश्यक आहे.
3. नूतनीकरनासाठी विद्यार्थाने उच्च शिक्षण संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या यादीमधील Application ID चा उपयोग करावा.

Documents Required

1. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
2. शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाचे संबंधित तहसिलदार अथवा सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमापणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
3. मागील वर्षाची गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे .
4. नूतनीकरणासाठी उपस्थिती प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.